फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

## (स्थापना : २६ जानेवारी १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९)

# वार्षिक अहवाल

## २००६-२००७


अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई - ४०० ०२८.
दूरध्वनी : २४२२ ३५ ८९ / २४२१ ९० ११

# श्रद्धांजली

मंडळाचे कार्यवाह, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते

## श्री. उमेश व्यं. शेणॉय

यांचे १६ जुलै २००७ रोजी आकस्मित निधन झाले.
त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.



**मंडळाच्या कीर्ती, प्रगती आणि
उन्नतीसाठी झिजणाऱ्या
अमर हिंद मंडळाच्या सेनापतींना
लाख लाख प्रणाम**

कार्यकारी समिती
अमर हिंद मंडळ

# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई - ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. २५/१२/२००७ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. वसंत भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :-

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन् २००६ - २००७ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.
३. सन् २००६ - २००७ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.
४. सन् २००७-२००८ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. सन् २००७-२००८ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
६. निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.
७. मंडळाच्या घटनेतील नियमात पुढील प्रमाणे सुधारणा करणे.

| घटनेतील नियम | सुचविलेला बदल | सुधारीत नियम |
|---|---|---|
| नियम क्र. २४ (३) पुढील वर्षासाठी 'अध्यक्ष' दोन 'उपाध्यक्ष' व 'हिशेब तपासनीस' यांची निवड करणे हिशेब तपासनीसाचे मानधन ठरविणे. | पुढील वर्षासाठी हिशेब तपासनीसाची नेमणूक करणे व हिशेब तपासनीसाचे मानधन ठरविणे. | नियम क्र. २४ (३) पुढील वर्षासाठी हिशेब तपासनीसाची नेमणूक करणे व हिशेब तपासनीसाचे मानधन ठरविणे. |
| नियम क्र. २४ (४) कार्यकारी समितीची निवडणूक करणे | मंडळाच्या अधिकारी वर्गाची निवडणूक करणे. | नियम क्र. २४ (४) मंडळाच्या अधिकारी वर्गाची निवडणूक करणे. |
| नियम क्र. २५ अध्यक्ष व दोन उपाध्यक्षांची नावे वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे सुचविण्यात येतील. कार्यकारी समितीकरिता वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारांच्या लेखी संमतीसह सूचक व अनुमोदक यांनी नावे सुचवावीत ही सुचविलेली नावे कार्यकारी समितीने तपासल्यावर वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येतील. जरुर असल्यास त्यांची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने होईल. | मंडळाच्या अधिकारी वर्गाची निवडणूक :- मंडळाचे अधिकारी ३ विश्वस्त, अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष व कार्यकारी समिती यांची निवड सर्वसाधारण सभेत सहमतीने अथवा निवडणूकीद्वारे होईल ही निवडणूक गुप्त मतदानपद्धतीने घेण्यात येईल. कार्यकारी समितीने नेमलेले निवडणूक अधिकारी निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर करतील. | नियम क्र. २५ मंडळाच्या अधिकारी वर्गाची निवडणूक : मंडळाचे अधिकारी, ३ विश्वस्त, अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष व कार्यकारी समिती यांची निवड सर्वसाधारण सभेत सहमतीने अथवा निवडणूकीद्वारे होईल ही निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेण्यात येईल. कार्यकारी समितीने नेमलेले निवडणूक अधिकारी निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर करतील. |

८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
दि. २०/११/२००७
अरुण अ. देशपांडे
कार्यवाह

## सूचना :

१. गणपूर्तीचे अभावी नियोजितवेळी सभा सुरु न झाल्यास सभा स्थगीत करण्यात येईल, ही स्थगीत सभा त्याच ठिकाणी १०.३० वाजता भरेल व ही सभा पूर्णपणे वैध असेल.

२. सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक, संस्थेच्या कामकाजासंबंधी सभेपुढे प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी ते मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दि. २० डिसेंबर २००७ पर्यंत सायं. ६ ते ८ या वेळेत (रविवार व्यतिरिक्त) सादर करावेत.

३. सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत तसेच हयात नसलेल्या सभासदाच्या संबंधितांनी तत्सबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७

### ★ विश्वस्त ★

श्री. दिनकर पाटील — ॲड. श्री. मुकुंद तिवरेकर

श्रीमती उषा मेहता

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | श्री. वसंत भालेकर |
| उपाध्यक्ष | : | श्री. रमेश वरळीकर |
| | | मेजर श्री. विजय अडसुळे |

### ★ कार्यकारी समिती ★

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. चिंतामणी नागले |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. अरुण देशपांडे |
| कार्यवाह | : | श्री. उमेश शेणॉय |
| संयुक्त कार्यवाह | : | श्री. सतीश रेडीज |
| कोषाध्यक्ष | : | श्री. श्रीकृष्ण राणे |
| सदस्य : | | श्री. दीपक पडते |
| | | श्री. भास्कर केरकर |
| | | श्री. चारुदत्त थरवल |
| | | श्री. संजय पेडणेकर |
| | | श्री. विजय राणे |
| | | डॉ. स्नेहल बिर्जे |
| सदस्य (स्वीकृत) | : | श्री. दत्ता सावंत, श्री. प्रफुल्ल पाटील |

# वार्षिक अहवाल
## (दिनांक १ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७)

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,
सादर वन्दे

मंडळाचा वार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणाला सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

अहवालकाळात मंडळाची आर्थिक बाजू मजबूत करताना त्याच बरोबरीने क्रीडा, कला, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत राहण्यात मंडळाने यश मिळविले आहे.

दि. २६ जानेवारी २००७ रोजी मंडळाच्या स्थापनेला साठ वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून ५९ वी वसंत व्याख्यानमाला ते ६० वी वसंत व्याख्यानमाला हा कालावधी हीरक महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्याचा कार्यकारी समितीने निर्णय घेतला. या हीरक महोत्सवी कालावधीत काही विशेष उपक्रम, कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मान्यवरांचा सहभाग असलेली हीरक महोत्सवी समिती स्थापन करण्यात आली. या समितीचे अध्यक्षस्थान मा. श्री. सुभाष सराफ यांनी भूषविले.

मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**सभा :** अहवाल कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या ०८ सभा झाल्या तर कार्यकारी समिति आणि विश्वस्त यांच्या ०५ संयुक्त सभा झाल्या (कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट अ पहा)

मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २४ डिसेंबर २००६ रोजी संपन्न झाली या सभेस एकूण २३ तहह्यात सभासद उपस्थित होते.

**तहह्यात सभासद :** अहवाल काळात तहह्यात सभासद करुन घेण्यात आले नाहीत.

**विभागवारी निधी :** अहवाल काळात इमारत निधीत १५,००,०००/- (रुपये पंधरा लाख फक्त) वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था :** १ जानेवारी २००७ ते ३१ डिसेंबर २००७ या कालावधीसाठी 'अंबिका डेकोरेटरर्स' यांना संपूर्ण केटरिंग, डेकोरेशन व्यवस्थेसाठी ठेकेदारी देण्यात आली.

**वसंत व्याख्यानमाला :** मंडळाची ५९ वी वसंत व्याख्यानमाला सोमवार, दि. २४ एप्रिल २००६ रोजी लोकसत्ता या लोकप्रिय दैनिकाचे संपादक मा. श्री. कुमार केतकर यांच्या महाराष्ट्रातील राजकरण : ताण आणि तणाव या ज्वलंत विषयावरील उद्घाटनपर व्याख्यानाने सुरु झाली. व्याख्यानमालेचा समारोप दि. ३० एप्रिल २००६ रोजी समाजसेवक, पत्रकार मा. श्री. शैलेश गांधी यांच्या माहितीचा अधिकार या बहुचर्चित विषयावरील व्याख्यानाने झाला. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट ब पहा)

## उपक्रम आणि कार्यक्रम :

★ **१६ एप्रिल ते १ मे २००६ :** बालनाट्य प्रशिक्षण शिबीर

★ **१३ मे २००६ : "यह शाम मस्तानी"** अमर हिंद मंडळ आणि मल्टिपल स्क्लेरोसिस सोसायटी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदीगाणी, नृत्य व नकलांचा कार्यक्रम.

★ **२७ मे २००६ :** मोबाईल तंत्रज्ञान व दुरुस्ती कार्यशाळा (विनामूल्य) अमर हिंद मंडळ आणि आस यांच्या संयुक्त विद्यमाने.

★ **१२ जून १००६ :** आपत्कालिन सरंक्षण प्रात्यक्षीक आणि मार्गदर्शन अमर हिंद मंडळ आणि

सिटीझन्स फोरम जी/उत्तर विभाग नागरी सरंक्षण दल यांच्या संयुक्त विद्यमाने.

★ १७ जून १००६ : लेख वाचक भेट "हृदयस्थ" आणि हृदयसंवादच्या लेखिका डॉ. अलका मांडके यांच्याशी वाचकांचा थेट संवाद. अमर हिंद मंडळ आणि आयडियल पुस्तक त्रिवेणी यांच्या संयुक्त विद्यमाने .

★ २९ जुलै २००६ : लेख वाचक भेट संगणकतज्ञ श्री. अच्युत गोडबोले यांचा वाचकांशी थेट संवाद. अमर हिंद मंडळ आयडियल पुस्तक त्रिवेणी यांच्या संयुक्त विद्यमाने.

★ १५ ऑगस्ट २००६ : स्वातंत्र्यदिनी शिक्षणक्षेत्राशी निगडीत, प्रखर राष्ट्रवादी, गांधीवादी, ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती नलिनी शहाणे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण.

★ १५ ऑगस्ट २००६ : मंगळागौरीचे पारंपारिक खेळ सादरकर्त्या अनघा देव आणि सहकारी

★ १ ऑक्टोबर २००६ : वरीष्ठ नागरीकांचा सत्कार (वरीष्ठ नागरिक दिन) अमर हिंद मंडळ आणि शिवाजी पार्क रोटरीक्लब यांच्या संयुक्त विद्यमाने.

★ १०,२६ ऑक्टोबर २००६: कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा

★ २० ते २५ ऑक्टोबर २००६ : हीरक महोत्सवी वर्षानिमित्त दिपोत्सव शिवाजी पार्क व श्री सिद्धीविनायक मंदिर भव्य कंदील आणि रोषणाई

★ २४,२५,२८ नोव्हें. २००६ : हीरक महोत्सवी वर्षानिमित्त महिला भजनी मंडळांची भजन स्पर्धा

★ ५ जानेवारी २००७ : महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत नाट्यप्रयोग.

★ १४ जानेवारी २००७ : हीरक महोत्सवीवर्षा निमित्त आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

★ १६ ते २१ जानेवारी २००७ : हीरक महोत्सवीवर्षा निमित्त राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा (पुरुष - महिला) हिरक महोत्सवी वर्षानिमित्त आंतर शालेय क्रीडा महोत्सव

★ २६ जानेवारी २००७ : प्रजासत्ताक दिन, सुप्रसिद्ध इतिहास संशोधक, समिक्षक डॉ. य. दि. फडके यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण

★ २६ जानेवारी २००७ : अमर हिंद मंडळाचा वर्धापन दिन "नवे सूर नवे तराणे"
सूर संगीताच्या क्षेत्रात नव्याने उदयास आलेल्या नव्या पीढीच्या गायकांची सुरेल मैफल
सहभाग - निहिरा जोशी, अमृता नातू, मंदार आपटे, कमलेश भडकमकर

★ २९ जानेवारी २००७ : हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आंतर शालेय कला महोत्सव

★ १८ फेब्रुवारी २००७ : निबंध स्पर्धा आणि मार्गदर्शन
१०वीच्या विद्यार्थ्यासाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आणि स्पर्धा व्याख्याते मार्गदर्शक श्री. मुरलीधर अच्युत जोशी

★ ३ मार्च २००७ : विश्वचषक कुणाचा ?
क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या निमित्ताने आयोजिलेला परीसंवाद-सहभाग-द्वारकानाथ संझगिरी चंदु बोर्डे, बापू नाडकर्णी, विनोद कांबळी, रमेश पोवार, हर्षा भोगले, अमोल मुजुमदार, रत्नाकर शेट्टी, अशोक प्रधान, रोहन चंपानेरकर याच प्रसंगी दत्ता सावंत संपादित विश्वचषक कुणाचा ? ह्या ओढ हिरवळीचा प्रकाशनगृह प्रकाशित पुस्तकाचे आणि द्वारकानाथ संझगिरी लिखित हायलाईट्स ऑफ वर्ल्ड कप ह्या रोहन पुस्तकाचे प्रकाशन झाले.

★ ८ मार्च २००७ : जागतिक महिला दिना निमित्त कार्यक्रम "वेध कर्तृत्वाचा"
विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार आणि परिसंवाद
सहभाग : लीना मेहेंदळे IAS, मेघा गाडगीळ IAS, मिनल मोहाडीकर, भारती लव्हेकर
सूत्रसंचालन : उत्तरा मोने

★ १७ मार्च २००७ : तन्वी आरोग्य सल्ला, आरोग्यविषयक चर्चा आणि सल्ला
सहभाग - डॉ. मेधा मेहेंदळे

## इतर संकीर्ण :

- ★ खेळाडूंसाठी व्यायाम शाळा सुरु करण्यात आली.
- ★ पाण्याच्या टाक्या साफ करणे, पत्र्यांवर डांबर टाकून घेणे, रंगरंगोटी, हॉलची दुरुस्ती इत्यादी कामे अहवालकाळात करुन घेण्यात आली.
- ★ अहवाल काळात ठरावाप्रमाणे कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्यात आली.
- ★ प्रतिवर्षाप्रमाणे माजी अध्यक्ष कै. मधुकर ज. फडके यांच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीसे देऊन गौरविण्यात आले.
- ★ प्रतिवर्षाप्रमाणे तहह्यात सभासद, आजी माजी खेळाडू हितचिंतक यांना दिवाळीची भेटकार्डे मंडळाच्यावतीने पाठविण्यांत आली.
- ★ कै. मधु दंडवते स्मृतीदिन–सोशलिस्ट फ्रन्ट, सद्‌गुरु सेवा मंडळ, आनंदाश्रम, इंडियन असोसिएशन ऑफ रिटायर्ड पर्सन, विंझाई देवस्थान मंडळ

  दादर जैन औषधशाळा, प्रकाशभाई मोहाडीकर गौरव समिती, पाठारे प्रभू क्षत्रिय होलिकोत्सव संघ इत्यादी संस्थाना मंडळाचे सभागृह सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात आले.
- ★ हीरकमहोत्सवी आणि राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे औचित्य साधून कबड्डी, खोखो खेळाडू, प्रशिक्षक यांना ट्रॅकसूट देण्यात आले.
- ★ नॅशनल स्कूल ऑफ ब्लाईण्ड या संस्थेला रु. १००० ची देणगी देण्यात आली.
- ★ इंडियन असोसिएशन फॉर दि हॅण्डीकॅप या संस्थेला रु. १५००/- ची देणगी देण्यात आली.

## विशेष अभिनंदनीय :

मंडळाचे कलाविभाग प्रमुख श्री. दत्ता सावंत यांच्या वीण या एकांकिकेस लेखन स्पर्धेत पारितोषिक मिळाले.

अहवाल कालावधीत तसेच हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमांत, उपक्रमांत सहभागी होऊन तहह्यात सभासदांनी दिलेले सहकार्य, मंडळाचे कर्मचारी, कार्यकर्ते, खेळाडू, कलाकार, हितचिंतक यांनी केलेले सहकार्य याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करुन आणि भविष्यकाळात आपणासर्वांकडून असेच सहकार्य मिळून मंडळाच्या प्रगतीत आपला हातभार लागेल अशी सदिच्छा व्यक्त करुन अहवाल समाप्त करीत आहे.

कळावे लोभ असावा तो वृद्धींगत व्हावा ही विनंती.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

अरुण अ. देशपांडे

कार्यवाह

# कला विभाग

मंडळाच्या कलाविभागातर्फे वर्षभरात आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांना तसेच कार्यक्रमांना मिळणारा प्रतिसाद निश्चितपणे वाढत आहे.वाढत्या प्रतिसादामुळे कलाविभाग मंडळाच्या नाव लौकिकास साजेशी कामगिरी करीत आहे.

## बालनाट्य प्रशिक्षण शिबीर

मुलं वार्षिक परीक्षेतून मोकळी झाल्यावर विविध शिबीरांचीआयोजनं होत असतात. मंडळाच्या कलाविभागातर्फे आयोजित केले जाणारे बालनाट्य प्रशिक्षण शिबीर आपली लोकप्रियता टीकवून आहे. कमी प्रवेश फी, चांगले मार्गदर्शक आणि भरपूर प्रात्यक्षिके तसेच समारोप प्रसंगी सादर केली जाणारी शिबिरार्थींची बालनाटके यामुळे मुलांना हवे हवेसे वाटणारे हे शिबीर १६ एप्रिल ते १ मे दरम्यान संपन्न झाले. शिवदास घोडके, संजय क्षेमकल्याणी, संभाजी सावंत, प्रशांत टीपणीस, मंगला प्रभू यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. १ मे रोजी झालेल्या समारोप प्रसंगी कलाविभाग प्रमुख दत्ता सावंत यांनी लिहीलेल्या तीन बालनाटिका सादर करण्यात आल्या तसेच दूरदर्शन सह्याद्री वाहिनी येथील निर्माती श्रीमती वंदना शर्मा यांचे प्रमुख उपस्थितीत शिबिरार्थींना प्रशस्तिपत्रके प्रदान करण्यात आली. या प्रसंगी श्रीमती शर्मा यांनी मंडळाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

सुट्टीतील उपक्रम या विषयावर सह्याद्री वाहिनीच्या हॅलो सखी या कार्यक्रमात कलाविभाग प्रमुख दत्ता सावंत यांची मुलाखत झाली. या मुलाखतीतून अमर हिंद मंडळाच्या उपक्रमांची तसेच समाजसेवेची माहिती योग्य प्रकारे देण्यात आली.

## कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा

एकांकिका स्पर्धांमध्ये नावारुपाला आलेली मंडळाची ही स्पर्धा या वर्षी पासून प्रेक्षक न्यायाधीश या संकल्पने ऐवजी प्रेक्षक चषक ही संकल्पना घेऊन संपन्न झाली. स्पर्धेची प्राथमिक फेरी मंडळाच्या सभागृहात तसेच मैदानात २९ ऑक्टोबर २००७ ला मंडप उभारुन घेण्यात आली या फेरीतून अरुण घाडीगांवकर, डॉ. तुळसी बेहेरे, श्रीमती प्रतिभा पाटील, सुप्रिया सबनीस या मान्यवर परीक्षकांनी अंतिम फेरीसाठी पाच एकांकिकांची निवड केली. तर अंतिम फेरी दि. १० नोव्हेंबर ०७ रोजी दुपारी ३ पासून श्री शिवाजी मंदिर दादर येथे संपन्न झाली या अंतिम फेरीचे परीक्षक म्हणून श्री. संजय डहाळे, डॉ. अनिल बांदीवडेकर आणि श्रीमती शकुंतला नरे यांनी काम पाहिले. संवेदन परिवाराची इन दि वर्ल्ड ऑफ ही एकांकिका प्रथम पारितोषिक विजेती ठरली. दुसरा क्रमांक आणि प्रेक्षकांनी मतदान करुन जाहिर झालेल्या प्रेक्षक चषक शैलेंद्र महाविद्यालयाच्या लव्ह ॲण्ड द ब्लाईण्ड एकांकिकेने पटकावला. इंद्रधनू, मुंबईची 'वधुपरीक्षा' तृतिय पारितोषिक विजेती एकांकिका ठरली.

या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय मराठी नाट्य परीषदेचे प्रमुख कार्यवाह श्री. प्रदीप कबरे तर विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते श्री. अशोक सराफ उपस्थित होते. श्री. प्रदीप कबरे यांनी मंडळाबद्दल काढलेले गौरवोद्गार तर श्री. अशोक सराफ यांनी प्रात्यक्षिकासह केलेले मार्गदर्शन यामुळे हा समारंभ दिर्घकाळ स्मरणात राहिल असा झाला.

## महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे कलाविभागाने या वर्षी देखील महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत भाग घेतला. बारा ते अठरा वर्षे वयोगटातील चाळीस मुलांनी काम केलेल्या अनाम बेटावरचा पहिला राजा या नाटकाचे लेखक आणि दिग्दर्शक कलाविभाग प्रमुख दत्ता सावंत होते. दि. ५ जानेवारी २००७ रोजी सायं. ७.०० वाजता रविंद्र नाट्य मंदिर येथे झालेला हा प्रयोग अत्यंत लक्षणीय झाला उपस्थित रसिकांच्या पसंतीत उतरलेला या नाटकात जितेंद्र आगरकर, चंदन जमदाडे, विशाल पाटील यांच्या भूमिका अत्यंत प्रभावशाली झाल्या.

## शालेय कला महोत्सव :

अमर हिंद मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त शालेय कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय स्तरावर समुहनृत्य आणि बालनाटिकांची स्पर्धा या कला महोत्सवात घेण्यात आली. कला महोत्सवाची प्राथमिक फेरी मंडळाच्या सभागृहात तर अंतिम फेरी दि. २९ जाने. ०७ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून श्री शिवाजी मंदिर येथे घेण्यात आली. बालनाटिका स्पर्धेत पार्ले टिळक असोसिएशन, भाऊराव पोटे विद्यालय कल्याण, अहिल्या विद्यामंदिर काळा चौकी यांनी तर समुह नृत्य स्पर्धेत इण्डियन एज्युकेशन सोसायटी मुलुंड, राजा शिवाजी विद्यामंदिर दादर, अहिल्या विद्या मंदिर काळाचौकी यांनी बक्षिसे पटकावली. कला महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभासाठी कु. श्रद्धा रानडे आणि मृण्मयी फडके प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या तर मा. श्री. माधव मंत्री प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

अशा प्रकारचा कलामहोत्सव आयोजित केल्याबद्दल या उपक्रमाचे शाळांनी स्वागत केले. विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्याबद्दल धन्यवाद दिले आणि असा उपक्रम दरवर्षी आयोजित करावा अशी विनंती केली.

कला विभागाच्या उपक्रमांना मिळत असलेला प्रतिसाद आणि मंडळाला असलेली प्रसिद्धी यामुळे कलाविभागाकडे आगामी वर्षात अधिक लक्ष केंद्रित करण्याचा मानस व्यक्त करीत आहोत.

# क्रीडा विभाग

## कबड्डी : (अ) सांघिक :

१) अजिंक्यतारा क्रीडा मंडळ (गिरगाव) जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेतील महिला गटाचे अजिंक्यपद, कु. प्रियांका झेंडे सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू म्हणून गुणगौरव.

२) आयडियल स्पोर्टस ॲकॅडमी आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत महिला गटाचे अजिंक्यपद कु. तृप्ती भाटकर व कु. आरती नार्वेकर यांचा अनुक्रमे स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू व उत्तम पकडींबद्दल गुणगौरव.

३) शिवनेरी सेवा मंडळ आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे महिला गटाचे उपविजयीपद कु. निकिता नेमाणे हिचा उत्तम चढाईची खेळाडू म्हणून विशेष कौतुक.

४) बालगोपाल मंडळ (डिलाइड रोड) यांच्या प्रथम श्रेणी जिल्हा स्तरीय पुरुष गटाचे अजिंक्यपद स्पर्धेतील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू म्हणून हेमंत रडके याचा गुणगौरव.

## (ब) प्रातिनिधिक संघात निवड :

१) तृप्ती भाटकर – मुंबई शहर संघात, राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील तसेच सुवर्णचषक अ. भा. स्पर्धेसाठी निवड आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठ संघात निवड.

२) माधुरी पावसकर – सुवर्ण चषक अ.भा. कबड्डी स्पर्धेसाठी मुंबई शहर संघात निवड

३) श्री साईनाथ काळसेकर (पुरुष), कु. अक्षया गोसावी (मुली), स्नेहा भोगले (मुली) व श्री. कमलेश नांदोस्कर (कुमार) यांची राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी आपापल्या गटाकरीता मुंबई शहर संघात निवड.

४) कु. प्रीती नागोटकर हिची आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी मुंबई संघात निवड

५) कु. कीर्ती महाजन व कु. ऋतुजा देऊळकर यांची अनुक्रमे १४ व १७ वर्षे वयोगटासाठी राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी, महाराष्ट्र संघात निवड.

## खोखो : प्रातिनिधिक संघात निवड :

(अ) राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई शहर संघात निवड

१) कु. विशाखा गव्हाणे (महिला) २) कु. नयन वाजे (मुली)

३) कु. प्रसाद राडये (किशोर) ४) कु. तन्वी शिंदे (किशोरी)

(ब) आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी मुंबई संघात कर्णधार म्हणून कु. शुभदा धुरीची निवड राष्ट्रीय शालेय खोखो स्पर्धेसाठी कु. अमेय गोडकर (१७ वर्षे वयोगट) महाराष्ट्र संघात निवड

## इतर विशेष :

१) श्री. प्रसाद कांबळीला पतीयाळाच्या राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरणाची राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती (रु. १०२००/-) मिळाली.

२) कु. शुभदा धुरी रुपारेल कॉलेजची २००६-०७ सर्वोत्कृष्ट अष्टपैलू विद्यार्थीनी म्हणून खास गुणगौरव

३) निलेश सावंत महाराष्ट्र राज्य पंच परीक्षा उत्तीर्ण

४) श्री. तन्वी शिंदे, बालमोहन शाळेची २००६-०७ ची सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू म्हणून खास गुणकौतुक.

## दैनंदिन सराव :

कबड्डी - मुल/मुली श्री. विजय राणे

खोखो - मुलं श्री. जतीन टाकळे, प्रसाद कांबळी,
मुली श्री. अमित संत

श्री. संजय पेडणेकर, श्री प्रफुल्ल पाटील, श्री. रमेश नाटेकर आवश्यक तेव्हा खोखोसाठी मार्गदर्शन करतात शिवाय मुख्य प्रशिक्षकांच्या गैरहजेरीत जेष्ठ खेळाडू सरावाची जबाबदारी सांभाळतात.

## हीरक महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने १६ ते २१ जानेवारी २००७ राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन

कबड्डी : आमंत्रितांच्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत १२ पुरुष व महिलांच्या ९ संघांना प्रवेश दिला होता. प्रथम गटवारी साखळी व नंतर बाद पद्धतीने स्पर्धा एकाच क्रीडांगणावर उत्तमपणे पार पडली. स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकासाठी सामने न खेळवता उपांत्य फेरीतील उपविजयी संघांना समान मूल्याची पारितोषिके दिली. त्याचे मानकरी होते पुरुष विभागात अंकुर क्रीडा मंडळ व एच.जी.एस.संघ तर महिला विभागात चेंबूर क्रीडा मंडळ आणि यात महिला पोलिसांचा भरणा असलेला वीरमाता जीजाऊ संघ.

महिलांचा अंतिम सामना छत्रपती शिवाजी विरुद्ध विश्वशांती २४-२७ असा अटीतटीचा झाला. मध्यंतराला विश्वशांतीकडे १३-६ अशी ७ गुणांची आघाडी होती. हा सामना मध्यंतरानंतर विशेष रंगला. शेवटची पाच मिनिटे शिल्लक असताना २०-२० अशी बरोबरी झाली. अखेर विश्वशांतीने सामना २७-२४ असा जिंकला. पुरुषांच्या अंतिम सामन्यात शिवनेरीने छत्रपतीला ३३-१८ असे नमविले ते दुसऱ्या डावातील आकर्षक खेळाने. विश्रांतीला शिवनेरीकडे केवळ ११-१० अशी एक गुणाची आघाडी होती. सामन्यात उत्तम पकडींचा पाऊस पडल्यामुळे उपस्थित ५००० प्रेक्षक खूश झाले.

पुरुष सर्वोत्कृष्ट चढाई - सुरेंद्र थोरवे व उत्कृष्ट पकड - हरीदीप सिंग (दोघेही शिवनेरी), सर्वोत्कृष्ट खेळाडूसाठी ठेवलेला रेफ्रिजरेटरचा मानकरी ठरला छत्रपतीचा जितेश जोशी.

महिला विभागात उत्कृष्ट पकडी स्वप्नाली साखळकर (छत्रपती), उत्कृष्ट चढाई - जयश्री सुवर्णा (विश्वशांती), अष्टपैलू (वॉशिंग मशीनची मानकरी) - स्वप्नाली म्हसकर (विश्वशांती). अंतिम दिवशी इराणच्या पुरुष कबड्डी संघाची उपस्थिती प्रमुख आकर्षण होती. तात्पुरत्या गॅलरीने व इलेक्ट्रॉनिक गुणफलकांमुळे प्रेक्षकांना कबड्डी खेळाचा मनमुराद आनंद लुटता आला.

विविध क्षेत्रातील तसेच कबड्डीतील जानेमाने व्यक्तींनी स्पर्धेला भेट देऊन संयोजनाचे कौतुक केले.

सुप्रसिद्ध उद्योजक विलास गावकर, उमेश मोहिते, प्रकाश शेट्ये, गिरीष शेट्ये आणि प्रवीण मयेकर, मधुकर कचवे यांच्यासारखे दानशूर क्रीडारसिकांनी आर्थिक सहाय्य केल्यामुळे स्पर्धेच्या संयोजनात अधिक भव्यता आली. पाऊण लाखांची पारितोषिके आणि नावीन्यपूर्ण आकर्षक भेटवस्तू अशी विजयीवीरांच्या कौतुकाने अमर हिंद मंडळाच्या हीरक महोत्सवी स्पर्धेची सुरेख सांगता झाली.

स्पर्धेते उद्घाटन उद्योजक श्री. विकास वालावलकर यांच्या हस्ते झाले तर पारितोषिके वितरण इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे संचालक श्री. अशोक प्रधान यांच्या हस्ते झाले.

***शालेय क्रीडा स्पर्धा :*** याच काळात शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. दिवसा उजेडी झालेल्या या स्पर्धांप्रसंगी राष्ट्रीय कीर्तीचे खोखो खेळाडू ललीत सावंत, गजानन वाईरकर, अर्चना मयेकर, मालती पाटील तसेच मैदान बचाव समितीचे अध्यक्ष श्री भास्कर सावंत आणि परळच्या डॉ. शिरोडकर हायस्कूलच्या माजी मुख्याध्यापिका सौ. सुनिता जावळे यांची खास पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली.

## अंतिम निकाल :-

***खोखो (मुलगे) विजयी संघ*** - महात्मा गांधी हायस्कूल वांद्रे, उपविजयी - मॉडर्न हायस्कूल स्कूल, दादर अष्टपैलू - प्रशांत मोहिते (महात्मा गांधी), संरक्षक - अखिल चुरी (मॉडर्न इंग्लिश स्कूल), आक्रमक - तेजस पवार (महात्मा गांधी).

***खोखो (मुली) विजयी संघ*** - महात्मा गांधी हायस्कूल वांद्रे, उपविजयी - महात्मा ज्योतिबा फुले कन्याशाळा, दादर, अष्टपैलू - मोक्षदा हतनकर (महात्मा गांधी), सरंक्षक - सोनल घाडगे (महात्मा गांधी), आक्रमक - गौरी ढोलम (महात्मा गांधी)

***कबड्डी (मुलगे) विजयी संघ*** - शारदाश्रम विद्यामंदिर, दादर, उपविजयी - जनता विद्यालय, वरळी, अष्टपैलू - मयूर खामकर (शारदाश्रम), चढाई - श्री भारती (शारदाश्रम), पकड - हेमंत जाधव (जनता).

***कबड्डी (मुली) विजयी संघ*** - मोहनाबाई चुनीलाल मेहता शाळा, काळाचौकी, उपविजयी महात्मा ज्योतिबा फुले कन्याशाळा, दादर, अष्टपैलू - तृप्ती चव्हाण (मो.चु.मे.शाळा), चढाई - अमिता खेडेकर (महात्मा फुले), पकड- सिद्धिका खामकर (मो.चु.मे.शाळा)

***लंगडी (मुलगे) विजयी संघ*** - महात्मा गांधी हायस्कूल, वांद्रे, उपविजयी - सोशल सर्व्हिस लिग, परळ, अष्टपैलू - सागर राणे (महात्मा गांधी), आक्रमक - प्रशांत मोहिते (महात्मा गांधी), सरंक्षक - भाग्यरत्न पवार (सोशल सर्व्हिस)

***लंगडी (मुली) विजयी संघ*** - महात्मा गांधी हायस्कूल, वांद्रे, उपविजयी - मनपा मराठी शाळा, दादर (पूर्व), अष्टपैलू - प्रज्ञा तांबे, मनपा शाळा (वूलन मिल), आक्रमक -सुनिता गोंधळे (महात्मा गांधी), सरंक्षक - मोक्षदा हतनकर (महात्मा गांधी)

याच विविध क्रीडा स्पर्धांच्या दरम्यान भारताच्या दौऱ्यावर असलेल्या **जपानच्या महिला कबड्डी** संघाचा प्रदर्शनीय सामना अमर हिंद मंडळाच्या महिला खेळाडूंबरोबर रंगला, बहारदार ठरला. जपानी कन्यकांना आता कबड्डीचा अचूक सूर गवसतोय याची यावेळी खात्री पटली. अटीतटीच्या लढतीत अमर हिंदने अखेर विजय नोंदवला.

भारताच्या दौऱ्यावर असलेल्या जपानी महिलांना प्रथमच पराभवाला सामोरे जावे लागले. पण त्यांनी कबड्डी खेळ उत्तमपणे आत्मसात केला आहे, हे उपस्थितांना पाहायला मिळाले. मंडळाने केलेल्या आदरातिथ्यावर पाहुणे खेळाडू खूष झाले त्यामुळे आयोजनासाठी अल्पावधी मिळाला असला तरी समाधान मिळाले.

## (परिशिष्ट 'अ')

## कार्यकारी समितीच्या सभा उपस्थितीची माहिती

| | |
|---|---|
| १) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | ८ |
| २) श्री. अरूण अ. देशपांडे ( कार्योपाध्यक्ष) | ८ |
| ३) श्री. उमेश व्यं. शेणॉय (कार्यवाह) | ८ |
| ४) श्री. सतीश श. रेडीज (सहकार्यवाह) | ८ |
| ५) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (कोषाध्यक्ष) | ७ |
| ६) श्री. दीपक ना. पडते (सदस्य) | ७ |
| ७) श्री. भास्कर भिवा केरकर (सदस्य) | ४ |
| ८) श्री. चारूदत्त शां. थरवल (सदस्य) | १ |
| ९) श्री. विजय प्र. राणे (सदस्य) | ८ |
| १०) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | ८ |
| ११) डॉ. स्नेहल मा. बिर्जे (सदस्य) | ५ |
| १२) श्री. प्रफुल्ल दा. पाटील (सदस्य स्विकृत) | ७ |
| १३) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य स्विकृत) | ६ |

(परिशिष्ट 'ब')

# वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५९ वे)

## कार्यक्रम पत्रिका

**सोमवार** दि. २४ एप्रिल २००६

वक्ते : मा. श्री. कुमार केतकर (संपादक दैनिक लोकसत्ता)

विषय : 'महाराष्ट्रातील राजकारण : ताण आणि तणाव'

**मंगळवार** दि. २५ एप्रिल २००६

वक्ते : मा. श्री. संजय महाशब्दे (वास्तुशास्त्रज्ञ)

विषय : 'वास्तुशास्त्रातील विज्ञान आणि आध्यात्मिकता'

**बुधवार** दि. २६ एप्रिल २००६

वक्ते : डॉ. बी. डी. उन्हाळे

विषय : 'छत्रपती संभाजी महाराज...मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध'

**गुरुवार** दि. २७ एप्रिल २००६

वक्ते : डॉ. अनंत जोशी, डॉ. महेश जुकर,
मा. श्री. वि. वि. करमरकर

विषय : 'क्रीडा वैद्यकशास्त्रावर चर्चा'

**शुक्रवार** दि. २८ एप्रिल २००६

वक्ते : मा. श्री. अनिल बोकील

विषय : 'भारतीय अर्थव्यवस्था : आत्महत्त्येतून आत्म सन्मान'

**शनिवार** दिनांक २९ एप्रिल २००६

वक्ते : डॉ. हेमंत टोणगांवकर, डॉ. श्रीपाद बाणावली,
डॉ. सौ. शुभदा चिपळुणकर

विषय "कर्करोगाचा वाढता प्रभाव, त्यावरील सध्याची उपचार पद्धती व हा रोग काबूत ठेवण्यासाठी रोग प्रतिबंधक संशोधनाची प्रगती"

**रविवार** दिनांक ३० एप्रिल २००६

वक्ते : मा. श्री. शैलेश गांधी

विषय : "माहितीचा अधिकार"




दिनांक २६ जानेवारी २००७ रोजी मंडळाच्या ६० व्या हीरकमहोत्सवी वर्धापनदिनी सुप्रसिद्ध लेखक व समिक्षक डॉ. य. दि. फडके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते त्यांना सन्मानित करतना मंडळाचे विश्वस्त श्री. दिनकरराव पाटील सोबत मंडळाचे पदाधिकारी



१० नोव्हेंबर २००६ रोजी कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी दादरच्या शिवाजी मंदिर नाट्यगृहात संपन्न झाली. त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे अभिनेते अशोक सराफ उपस्थित होते. त्यांना सन्मानित करताना मंडळाचे विश्वस्त ॲड. तिवरेकर व इतर पदाधिकारी.



२४ एप्रिल २००६ रोजी ५९ व्या वसंतव्याख्यानमालेच्या उद्‌घाटन प्रसंगी लोकसत्ता या लोकप्रिय दैनिकाचे संपादक कुमार केतकर ह्यांचे आगमन झाले त्याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी.



१६ जानेवारी २००७ रोजी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्‌घाटन प्रसंगी उद्योजक श्री. विकास वालावलकर खेळाडूंशी परीचय करुन घेत असताना. सोबत मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंत भालेकर, कार्यवाह श्री. उमेश शेणॉय व इतर